पुढारी

# 'रवळनाथ'कडे रौप्य महोत्सवी ठेव योजनेत २२ कोटी : चौगुले

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**



येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या रौप्य महोत्सवी ठेव योजनेत ९ शाखांत मिळून विक्रमी २० कोटी २५ लाखांच्या ठेवी जमा झाल्या तर गुढीपाडव्यानिमित्त एका दिवसात एकूण २ कोटी २८ लाखांच्या ठेवी संस्थेत जमा झाल्या अशी माहिती संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

यावेळी चौगुले म्हणाले, गेल्या दोन वर्षांपासून देशात कोरोनाचे सावट आहे तरी देखील पारदर्शक कारभारामुळे रवळनाथकडे ठेवींचा वाढता ओघ कायम राहिला आहे. सध्या रौप्य महोत्सवीवर्षानिमित्त सर्व शाखांमध्ये विक्रमी ठेवी आल्या आहेत. याशिवाय गुढीपाडव्याला २ कोटी ४० लाखांच्या ठेवी जमा झाल्या आहेत. सर्वाधिक ठेवी गडहिंग्लज शाखेमध्ये त्यापाठोपाठ कोल्हापूर शाखेने जमा केल्या आहेत.

उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, सर्व संचालक, सर्व शाखा चेअरमन व सल्लागार, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, व्यवस्थापक शिवानंद घुगरे, चिफ अकौंटंट एकनाथ केसरकर यांच्यासह सर्व शाखाधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले, असेही श्री. चौगुले यांनी सांगितले.

My Kolhapur Edition
Apr 3, 2022 Page No. 10
newspaper.pudhari.co.in